# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ०८ /२०२३**

०१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवाराच्या व व्यक्तींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातून विद्यापीठात सकाळी व सायंकाळी व्यायाम व विहारासाठी येणारे वॉकर्स / जॉगर्स यांची नोंदणी करण्यात येणार आहे.

०२. सदर नोंदणी ही विनामुल्य असणार आहे.

०३. या नोंदणीकरिता विद्यार्थी सुविधा केंद्राजवळी सुरक्षा केबीन येथे व सुरक्षा विभाग या दोन ठिकाणी डेस्क ठेवण्यात येणार असून नोंदणी फॉर्म सदर डेस्क येथून घेवून तो भरुन जमा करावयाचा आहे.

०४. सदर नोंदणी ही दिनांक १८ जानेवारी, २०२३ ते दिनांक २८ जानेवारी, २०२३ या कालावधीमध्ये करण्यात येणार आहे.

०५. पुढील काळात नोंदणी धारकांना बायोमेट्रीक प्रवेश देण्यात येणार आहे.

०६. तरी सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी वरील नमूद नोंदणी त्वरीत करुन घ्यावी. जेणेकरुन पुढील गैरसोय होणार नाही.

०७. सदर नोंदणीची कार्यवाही सुरक्षा विभागामार्फत करण्यात येणार आहे.

कळावे,

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे : ४११ ००७.**
**जावक क्र. सु.वि./ २e/२०२३,**
**दिनांक :- १८/०१/२०२३**
**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-</u>**

०१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग,
०२. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
} सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

०३. मा. व्यवस्थापक, आय.टी. सेल - कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

D:\sahadev\circular\Circular Drafting.docx